आनंदनगर येथील रहिवाशींवर रेल्वे प्रशासन वतीने होणारी कारवाई थांबवावी - शैलेश मोरे

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 17/१२/२०२४ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 04 ‖ RNI - MAHMAR51259 ‖ metrocity924@gmail.com



# महानगरपालिका निवडणुका लवकरच ?

## इच्छुकांची आपापल्या प्रभागात भेटीगाठी घेण्यास सुरुवात




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

लोकसभा झाली, विधानसभा ही झाली, आता वेध लागले महानगरपालिका निवडणुकीचे, संपूर्ण महाराष्ट्रात अनेक महानगरपालिकांच्या निवडणुका रखडल्या आहेत.

या महानगरपालिकेच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. यां ना त्या कारणाने अनेक वेळा महानगरपालिका निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या महाविकास आघाडीच्या काळात कोरोना सारख्या भयंकर आजारामुळे काही महानगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या तर कधी राजकीय आरक्षणाच्या नावाने महानगरपालिका रखडत गेल्या परंतु आता लोकसभा निवडणूक झाल्या, तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मोठे यश मिळाले आता महायुतीचे सरकारही स्थापन झाले, देवेंद्र फडणवीस परत एकदा मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले आहेत, त्यामुळे आता महानगरपालिका निवडणुका लवकरच होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात एकूण 30 याचिका दाखल आहेत या याचिकांचा निकाल एकत्रितपणे लागणार आहे हा निकाल लागला की लगेचच महानगरपालिका निवडणूक जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात महानगरपालिके च्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या आजी-माजी नगरसेवक तसेच तरुण इच्छुक यांनी आपापल्या प्रभागात मतदारांच्या भेटीगाठी घेणे सुरुवात केली आहे. तसेच प्रभागातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेत आहेत. महानगरपालिका निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर 2022 पासून प्रशासकीय कारभार सुरू आहे या प्रशासकीय कारभार पद्धतीमुळे अनेक सामान्य नागरिक त्रस्त आहेत. तसेच या प्रशासकीय कारभारात अनेक भ्रष्टाचार झाला असल्याचे आरोप होत आले आहेत त्यामुळे महानगरपालिका निवडणूक लवकरच व्हावे असे अनेकांचे मत आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर आपापल्या प्रभागात लोकप्रतिनिधी नगरसेवक म्हणून निवडून येतात व आपापल्या प्रभागातील समस्या सोडविण्यावर भर देतात सामान्य नागरिकही आपण निवडून दिलेल्या नगरसेवकावर विश्वास ठेवत आपापल्या प्रभागातील अडी अडचणी महानगरपालिकेच्या माध्यमातून सोडवीत असतात सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी नसल्याने सध्या सामान्य नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रशासकीय कारभार कधी संपतो व महानगरपालिका निवडणुका कधी होतात याकडे सामान्य नागरिकांचेही लक्ष लागले आहेत.

परंतु आता या रखडलेल्या महानगरपालिका निवडणुका लवकरच होतील. येणाऱ्या दिवसात सर्वोच्च न्यायालयात या महानगरपालिका संदर्भात दाखल झालेल्या याचिकांवर लवकरच निकाल येईल व एप्रिल किंवा मे महिन्यात पावसाळ्यापूर्वी महानगरपालिका निवडणुका होतील असे काही जाणकारांचे मत आहे.

# पिंपरी चिंचवड शहराला यंदाही मंत्रीपद नाहीच

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

विधानसभा निवडणूक झाली विधानसभा निवडणुकीचा निकाल ही आला व महायुतीला भरघोस मतदान मिळाले महायुतीचे सरकार स्थापन झाले तसेच निवडणुकीच्या निकालानंतर तब्बल 22 दिवसांनी महायुतीच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा संपन्न झाला यावेळी तरी पिंपरी चिंचवड शहराला मंत्रीपद मिळेल अशी सर्वांनाच आशा होती मंत्रीपदासाठी पिंपरी चिंचवड शहरात निवडून आलेले तीनही महायुतीचे आमदार इच्छुक होते चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे या तीनही



आमदारांपैकी एकही आमदाराला मंत्रीपद देण्यात आले नाही अनेक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहराला मंत्रीपद मिळणार असे बोलले जात होते परंतु यावेळीही पिंपरी चिंचवड शहराला मंत्रीपद मिळाले नाही भोसरी विधानसभा मतदारसंघात आमदार महेश लांडगे यांनी आमदारकीची हॅट्रिक केली त्यामुळे त्यांना मंत्रीपद नक्कीच मिळेल असे सांगितले जात असतानाच यावेळी ही महेश लांडगे यांना मंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आले त्यामुळे आता पिंपरी चिंचवड शहराला कधी मंत्रीपद मिळते याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे अडीच वर्षांनंतर तरी पिंपरी चिंचवड शहराला मंत्रीपद मिळेल अशी सर्व पिंपरी चिंचवड शहरवासीयांना आशा आहे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सचिन साठे फाउंडेशन च्या वतीने आठवडे बाजार सुरु

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने विशाल नगर, पिंपळे निलख येथे सुरू केलेला आठवडे बाजार हा एक स्तुत्य उपक्रम आहे. येथे शेतकरी ते थेट ग्राहक विक्री सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.




येथे नागरिकांच्या सुविधे साठी प्रशस्त पार्किंग देखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. खाजगी जागेत आठवडे बाजार भरणारा हा शहरातील पहिलाच प्रयोग आहे. याचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार तथा भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.आठवडे बाजारचे आयोजक सचिन साठे यांनी सांगितले की, स्व. आमदार विनायक निम्हण यांच्या स्मरणार्थ पिंपळे निलख, विशालनगर, हॉटेल रंगीला पंजाब शेजारील जागेत शेतकरी राजा कष्टकरी संघटनेचे नवनाथ गरुड आणि त्यांचे सहकारी यांनी या ठिकाणी जुन्नर, लोणी काळभोर, शिरूर येथील शेतकऱ्यांचे सेंद्रिय शेती उत्पादनाचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. येथे स्वच्छ, ताजा भाजीपाला व फळे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. दर शुक्रवारी या ठिकाणी दुपारी तीन ते रात्री नऊ वाजेपर्यंत विक्री सुविधा आहे. या परिसरात वाढलेल्या सोसायटीतील नागरिकांना कमीत कमी अंतरावर खरेदीचा लाभ घेता येईल. प्रशस्त पार्किंग उपलब्ध करून दिल्यामुळे वाहतुकीला देखील अडथळा होणार नाही.यावेळी पोलीस पाटील भुलेश्वर नांदगुडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष वृषालीताई मरळ, शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष चेतन भुजबळ, काळूराम महाराज इंगवले, काळूशेठ नांदगुडे, विजय जगताप, बाळासाहेब जगताप, नितीन इंगवले, अनंत कुंभार, अशोक बालवडकर, अनिल संचेती, शिवाजी दळवी आदींसह शेकडो ग्राहक उपस्थित होते.

# नातेसंबंध जपण्यातील अपयश

## हिच वृद्धाश्रमाची वाट असणं हे चिंताजनक - कवी म.भा.चव्हाण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

अलिकडच्या काळात कुटुंब संस्था व नाते संबंधामध्ये निर्माण झालेली दरी चिंताजनक बाब असून वृद्धाश्रमांची गरज त्यामुळे निर्माण झाली असल्याची भावना प्रसिद्ध कवी म. भा. चव्हाण यांनी आज येथे व्यक्त केली.

आंदर मावळमधील कुसवली येथील सहारा वृद्धाश्रमात आयोजित करण्यात आलेल्या" आयुष्यावर बोलू काही" या कविता व जीवनविषयक भावविश्व उलगडणाऱ्या मुक्त संवाद मैफिलीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. साहित्यिक प्रा. तुकाराम पाटील,

भारुडकार-नाटककार कवी परशुराम वाघचौरे, कवी श्रीधर पाटील, दिलीप विधाटे, बालाजी थोरात, कवयित्री प्रीती सोनवणे, रूपाली भालेराव , गुणवंत कामगार कवी सुभाष चव्हाण आदी मानवर यामध्ये सहभागी झाले होते.

यावेळी कवी म.भा. चव्हाण पुढे म्हणाले की," आई-वडिलांची सेवा करणे म्हणजेच आपल्या संस्कृतीला जतन करण्यासारखे आहे.

सहारा वृद्धाश्रम म्हणजे आपलेपणाचा व करुणेचा ओलावा निर्माण करणारे माणुसकीचा झरा आहे.

आयुष्याच्या सांजवेळी आधारा देणार हे सहारा केंद्र आहे." विविध अनुभवांची मांडणी करत हा कार्यक्रम मान्यवरांनी आपल्या अनुभवातून फुलवला.




तीन तास चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये वृद्धाश्रमातील सर्व आजी-आजोबा यांनी समाधान व्यक्त केले. सहारा वृद्धाश्रमातील कुसुम सोनवणे व गणपत शिंदे या आजी आजोबांनी आपल्या आयुष्यातील वृद्धाश्रमा पर्यंतचा प्रवास उलगडून सांगितल्याने सर्वांना गहिवरून आले. कार्यक्रमाचे संयोजन नक्षत्राचं देणं काव्यमंच संस्थेचे प्रा. राजेंद्र सोनवणे व सहारा वृद्धाश्रमाचे संचालक विजय जगताप यांनी केले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 17/१२/२०२४
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरी -नेहरूनगर रोड बनलाय अपघाती रस्ता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी नेहरूनगर रोड रस्त्यावरील उतार हा जीवघेणा असून या रस्त्यावरून प्रवास करताना अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे. या रस्त्याच्या आजूबाजूला दुकाने, कार्यालये आहेत. येथे नागरिकांची नेहमी रहदारी असते. शिवाय रस्त्यालगत गांधीनगर वसाहत,जय गणेश वरदहस्त सोसायटी ,महिंद्रा ॲन्थीया सोसायटी,लोखंडे कामगार भवन , ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सभागृह,आदी असल्याने रस्ता ओलांडत असताना जीव मुठीत घेऊन नागरिक रस्ता ओलांडत आहेत.या अगोदर रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या वाहनांना लगाम बसावा म्हणून उताराजवळील महात्मा फुले स्मारकासमोर गतिरोधक बसविण्यात आले होते. परंतु काही कारणांमुळे या रस्त्यावरील



गतिरोधक काढण्यात आले . गतिरोधक काढून तीन वर्ष होऊनही या उताराच्या रस्त्याला गतिरोधकच नसल्याने अपघातांची मालिका सुरू आहे. अशावेळी अनर्थ घडल्यास जिम्मेदार कोण, असा सवाल नागरिक करीत आहेत. यासाठी नेहरूनगर भोसरीला जोडणा-या रस्त्याला गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे. या मुले महानगर पालिकेने या कडे लक्ष देऊन लवकरात लवकर या पिंपरी नेहरू व नगररोड रस्त्यावर गतिरोधक बसवावे अशी मागणी ॲड.दिपक साबळे यांनी केली आहे.

**प्रतिक्रिया :**

विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर चौकातून नेहरूनगर भोसरीला जोडणा-या रस्त्याच्या उतारापासून गांधीनगर झोपडपट्टीच्या एकवळणापर्यंत वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी गतिरोधकच नसल्याने वाहने सुसाट वेगाने चालविली जातात. त्यामुळे अपघातांना आमंत्रण मिळत असून, अपघातांची मालिका सुरूच आहे. तरी संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने गंभीर दखल घेऊन याठीकाणी कमीत कमी तीन गतिरोधक बसवावेत तरच पुढील अनर्थ टळेल.



**- ॲड.दिपक साबळे**

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी एस आय टी मार्फत चौकशी करावी

## माजी खासदार अमर साबळे






दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : परभणीमधील आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी आज महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. 10 डिसेंबरला संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली होती, आणि त्याविरोधात 11 तारखेला आंदोलन करण्यात आलं होतं.त्याच आंदोलनादरम्यान दगडफेक तसेच तोडफोड झाली होती.

दगडफेक केल्याच्या आरोपाखाली सोमनाथ सूर्यवंशी यांना अटक करण्यात आली होती. 14 तारखेला त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलं. मात्र काल सकाळी (15 डिसेंबर) सोमनाथ सूर्यवंशी यांचा सकाळी मृत्यू झाला. त्यानंतर आज आंबेडकरी अनुयायांकडून आज संपूर्ण महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली या पार्शवभूमीवर पिंपरी चिंचवड शहरात भाजप चे माजी राज्यसभा खासदार अमर साबळे यांच्या उपस्थितीत सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली देण्यात आली या वेळी सदर संपूर्ण प्रकरणाची एस आय टी मार्फत चौकशी करावी अशी मागणी माजी खासदार अमर साबळे यांनी केली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 17/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# रेल्वे प्रशासन वतीने होणारी कारवाई थांबवावी

## आनंदनगर येथील रहिवाशींवर रेल्वे प्रशासन वतीने होणारी कारवाई थांबवावी - शैलेश मोरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरातील आनंदनगर चिंचवड स्टेशन येथे रेल्वे प्रशासनाने कारवाई करण्यासाठी येथील रहिवाशांना ताबडतोब घरे मोकळी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्या संदर्भात नोटीस देखील बजावलेली आहे परंतु आनंद नगर चिंचवड स्टेशन येथे रेल्वे प्रशासनामार्फत होत असलेली कारवाई थांबवावी अशी मागणी माजी नगरसेवक शैलेश मोरे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्याकडे केली आहे.**



महानगरपालिका वतीने आनंदनगर मधील रहिवाशींकरिता एस. आर. ए. प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत आनंद नगर मधील या रहिवासी करिता राहण्याची योग्य ती सोय करावी अशी मागणी माजी नगरसेवक शैलेश मोरे यांची आहे. सदर मागणीकरिता शैलेश मोरे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्याशी हि चर्चा केलीआहे , यावेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही या विषया संदर्भात सांगितले आहे तसेच माजी नगरसेवक शैलेश मोरे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडेही आनंदनगर मधील रहिवाशांसाठी योग्य ती सोय करण्याची मागणी केली आहे.

आता सदर मागणीची निवेदन शैलेश मोरे यांनी खासदार बारणे यांना दिले सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आनंदनगर येथे एस. आर. ए. मार्फत रहिवाशंकरिता गृह प्रकल्प लवकरच राबविण्यात येणार आहे. मात्र त्याआधीच रेल्वे प्रशासन मार्फत कारवाई होणार असल्यामुळे आनंदनगर मधील नागरिकांची गैरसोय होणार आहे, त्यामुळे सदर नागरिकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ट्रांजिट कॅम्प बांधून मिळणे कामी खासदार स्तरावर माननीय आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना पत्र व्यवहार करून लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा व नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी तसेच रेल्वे प्रशासन मार्फत होणारी सदर कारवाई थांबवावी अशी मागणी शैलेश मोरे यांनी केली आहे.

सदर निवेदन देताना त्यांच्यासोबत माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, माजी नगरसेवक काळुराम पवार यांच्यासह मारुती पंढरी, ज्योती शिंदे, नेताजी शिंदे, विनोद क्षीरसागर, दादाराव कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करा

## - ओबीसी नेते लक्ष्मण हाके



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: राज्यातील महायुती सरकारचा काल नागपूर येथे मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा पार पडला. या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये अनेक नव्या चेहऱ्याना संधी देण्यात आली. मात्र अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे राज्यातील ओबीसी समाज नाराज झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका मांडली असून अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करावे आणि छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून डावलून ओबीसी समाजाच्या मतांचा अजित पवार यांनी अपमान केला असल्याचा आरोप देखील लक्ष्मण हाके यांनी केला आहे.तसेच ते पुढे म्हणाले की, विधिमंडळातील सर्वात ज्येष्ठ सभासद म्हणून छगन भुजबळ असून त्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले. त्यामागे नेमकी कोणती कारणे होती. याबाबत अजित पवार यांनी समोर येऊन उत्तर द्यावे, अडीच वर्षाच्या मंत्रिपदाचा पायंडा पाडणारे अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री देणार असल्याचे पुढे सांगावे, आम्ही सर्व शांत बसू आणि छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री पद द्यावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968